N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): गडचिरोली    P.S. (पोलीस ठाणे): गडचिरोली    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0371    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 03/04/2026 04:31 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार    Date from (दिनांक पासून): 02/04/2026    Date To (दिनांक पर्यंत): 02/04/2026

Time Period (कालावधी):    Time From (वेळेपासून): 13:29 तास    Time To (वेळेपर्यंत): 16:59 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 03/04/2026    Time (वेळ): 01:00 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 007    Date and Time (दिनांक आणि वेळ): 03/04/2026 04:31 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पश्चिम, 03 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी , समिती कार्यालय गडचिरोली,गडचिरोली

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): पोलीस निरीक्षक संतोष बुधा पाटील

(b) Father's Name (चे नाव ): बुधा पाटील

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1981

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय): नोकरी

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि गडचिरोली, गडचिरोली, गडचिरोली, गडचिरोली, महाराष्ट्र-442605, भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि गडचिरोली, गडचिरोली, गडचिरोली, गडचिरोली, महाराष्ट्र-442605, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9892753374

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 500 रू. दराच्या 02 नोटा | 1,000.00 |
| 3 | इतर | कच्चा माल | खाकी क्रिम रंगाची शर्ट | .00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

पोस्टे गडचिरोली
दिनांक 03/04/2026

मी संतोष बुधा पाटील, वय 45 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली मो. नं. 9892753374, समक्ष पोलीस स्टेशन गडचिरोली येथे हजर येवुन सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे दि. 11/09/2024 रोजी पासुन पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे.

दिनांक 02/04/2026 रोजी पोलीस उप अधिक्षक विक्रांत सगणे यांनी आम्हाला 10.25 वा. त्यांचे दालनात बोलावुन तक्रारदार श्री. सुकीराम श्रीहरी भांडेकर, वय 48 वर्ष, शिक्षण- 8 वी, धंदा-मजुरी, रा. मु.पो. नवेगाव (रै) ता. चामोर्शी जि. गडचिरोली मो. क्र. 8806823562 यांची ओळख करून देवुन त्यांची एका लोकसेवकाविरूदध तक्रार असुन त्यांचे तक्रारी प्रमाणे कार्यवाही करण्यास कळविल्याने आम्ही त्यांना आमचे दालनात नेवुन त्यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारपुस करून सदर मजकुराची तोंडी तक्रार एका कागदावर लिहुन देणेस सांगुन त्यांना पेन व कागद उपलब्ध करून दिला असता त्यांनी आपली लेखी तक्रार लिहुन दिली. त्यानंतर आंम्ही लेखी पत्र पाठवुन कार्यवाहीकरीता लागणारे दोन शासकीय पंच पाटबंधारे विभाग गडचिरोली येथून पाचारण केले त्यानुसार दोन्ही पंच ला.प्र.वि. कार्यालयात 12.20 वा. हजर आले असता त्यांस आम्ही आमचा व तक्रारदार यांचा परीचय करवुन देवुन सापळा पथकातील सदस्याची ओळख करून दिली. पंचांना तक्रारदार यांची एका लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार आहे असे सांगता पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नांव विचारता तक्रारदाराने आपले नाव सुकीराम श्रीहरी भांडेकर असे सांगुन त्यांची तक्रारीची तोंडी हकीकत सांगीतली. त्यानंतर त्यांना तक्रारदाराची स्वहस्ताक्षरातील लेखी तक्रार वाचणेस दिली असता तक्रारदार यांनी पंचांना तोंडी कथन केलेली तक्रार व स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार एकच मजकुराची असल्याची पंचांची खात्री झालेवर सदर तक्रारीवर पंचांनी व आंम्ही आमच्या सह्या केल्या. तक्रारदार यांना लेखी लिहुन दिलेली तक्रार खालीलप्रमाणे

श्री. सुकीराम श्रीहरी भांडेकर , वय 48 वर्ष शिक्षण- 8 वी, धंदा-मजुरी, रा. मु.पो. नवेगाव (रै) ता.

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मंगेश मनोहर आंबोरकर | | वडील चे नाव : मनोहर आंबोरकर | 1. कम्प एरीया,रामपुरी,Town/Village (शहर / गाव): वार्ड,क्र18,गडचिरोली,Tehsil (तहसील): गडचिरोली,Police Station (पोलीस ठाणे): गडचिरोली,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र-442605,भारत |
| 2 | दिनेश कवडू सिडाम | | वडील चे नाव : कवडू सिडाम | 1. महीला महाविद्यालयाचे मागे,Town/Village (शहर / गाव): वद्धाश्रम जवळ,गडचिरोली,Tehsil (तहसील): गडचिरोली,Police Station (पोलीस ठाणे): गडचिरोली,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र-442605,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

लागलीच

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | सनडीक्स कंपनीचे मेमरी कार्ड 01 नग | .00 |

कार्यालय गडचिरोली येथे तक्रारदाराचे दुचाकी वाहन क्र. एमएच 33 पी 2905 ने रवाना करण्यात आले. त्यांचे परत येण्याची प्रतिक्षेत आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पथक लाप्रवि कार्यालयात थांबुन राहीलो.

गडचिरोली त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार सुकीराम भांडेकर व पंच क्र. 1 सुरेश राठोड असे आम्ही थांबुन असलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे जवळील व्हाईस रेकॉर्डर माझे सांगणेवरून पोअं घोरमोडे यांनी पंच क्र. 1 यांचे वक्तव्य घेवुन 15.04 वा. बंद केला. व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकार्ड झालेले संभाषण आम्ही तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये तेथील सिडाम नावाचे कार्यालय सहायकाने तक्रारदाराचे मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्राकरीता अर्जासोबतचे कागदपत्रे चेक करून ' आता कोणाकडुन दोन हजाराच्या खाली नाही घेत , आता दोन हजार मार तेती तु,' असे म्हणुन त्याचे वरीष्ट आंबोरकर साहेब यांना 2000/- रूपये देणेकरीता तक्रारदारास मागणी केली असता तक्रारदार यांनी 'पुर्ण कागद झाले आहेत तरी पैसे लागतात का' असे विचारले असता श्री. सिडाम यांनी 'हो ....अपलोड कराले' असे म्हणुन आंबोरकर यांचे करीता मागणी केल्यावर तक्रारदार यांनी आमने सामने बोलु द्या अशी विंनती केली असता 'किती देता' असे म्हणुन आंबोरकर यांचेकडे घेवुन गेले असता सदर ठिकाणी तक्रारदार यांनी पडताळणी दरम्यान श्री. आंबोरकर यांना कागदपत्रे पुर्ण असल्याचे सांगीत असतांना सिडाम यांनी 'कमी मधे करून टाका'असे श्री. आंबोरकर यांना सांगीतले त्यावर श्री. आंबोरकर यांनी तक्रारदारास 'किती देता तुंम्ही सांगा, किती देता काम जर नाही झाला तर पैसेही नको द्या,तुले जेवढा कराचा आहे तेवढा कर, हजार करून टाका , इमानदारीने आणाचा , आम्ही बारा वाजातले तरी येतीच आहोन' वैगेरे मजुकराचे लाच मागणी संदर्भाने बोलणे करून प्रकल्प सहायक आंबोरकर व कार्यालय सहायक सिडाम या दोघांनी लाचे संदर्भाने तक्रारदारासोबत बोलणे करून श्री. सिडाम यांनी लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे व श्री. आंबोरकर यांनी लाच स्वता करीता तडजोडी अंती 1000/- रू. जात पडताळणी कार्यालय गडचिरोली येथे आज दि. 02/04/2026 रोजी स्वीकरण्याची तयारी दर्शविल्याचे दोन्ही पंचासमक्ष लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. त्यावरून आम्हा सर्वानुमते श्री आंबोरकर व श्री. सिडाम यांचे विरूध्द सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर आमचे सुचनेवरून पोअं प्रविण जुमनाके यांनी अँथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन तक्रारदार व पंचाना त्याचे प्रात्यक्षीक दाखविले. तक्रारदार यांनी त्यांचे बचतीतील हजर केलेली पाचशे रूपये दराच्या 2 नोटांचे क्रमांक नोंद करता ते OVT 162016, OLN 721602 असे असुन एकुण 1000/- रू. रक्कमेच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावली. सदरील अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार याच्या शर्टाच्या समोरील खिशात ठेवल्या व आम्ही तक्रारदार व पंचाना पुन्हा सविस्तर सुचना देवुन श्री आंबोरकर व श्री. सिडाम यांनी लाच स्विकारल्यानंतर रूमालाने चेहरा पुसून इशारा करणेबाबत तक्रारदार यांना सुचना दिली. तसेच सापळा पथकातुन पोशि जुमनाके यांना वगळुन त्यांना कार्यालयातच थांबुन राहणेची सुचना देवुन आंम्ही व पोउपअधी. श्री. सगणे सो. यांनी सापळा पथकांतील इतरांना त्यांचे दबा धरून बसण्याचे ठिकाण कळवुन सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर माझे सुचनेवरून पोअं घोरमोडे यांनी 16.30 वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझे, तक्रारदार व पंचाचे वक्तव्य घेवुन तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील खिसा असलेल्या बंडी बनियानला

चामोर्शि जि. गडचिरोली मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे येऊन लेखी तक्रार देतो की, मी वर नमुद पत्यावर परिवारासह राहातो आणि हातमजुरीचे काम करतो.

मला एक मुलगा नांव वैभव व मुलगी नांव प्राजक्ता असे असुन माझी मुलगी कु. प्राजक्ता भांडेकर हिने यावर्षी 12 वीची परिक्षा दिली आहे. तिचे पुढील शैक्षणिक कामाकरीता जात पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने मी दि. 31/03/2026 रोजी सर्व आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा जात पडताळणी समिती, गडचिरोली यांचेकडे ऑनलाईन अर्ज केला व त्याबाबत विचारणा करण्यासाठी दि. 01/04/2026 रोजी जात पडताळणी कार्यालय गडचिरोली येथे जावून 10.45 वा. दरम्यान संबंधीत काम करणारे श्री. आंबोरकर बाबू यांची भेट घेवून अर्ज प्राप्त झाला का अशी विचारणा केली असता श्री. आंबोरकर बाबू यांनी त्यांना प्राप्त झालेला ऑनलाईन अर्ज पाहून " ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दिनांक 31/03/2026 पर्यंत होती ती तारीख गेली आहे, तरी सुध्दा मी तुमचा काम करून देतो " असे सांगुन माझ्या मुलीचे कागदपत्रे चेक करून त्यात काही कागदपत्रे कमी आहे, ते आणुन दिल्यावर जात प्रमाणपत्र पाहिजे असल्यास 5000/-रू. द्यावे लागेल, असे म्हणाले. त्यावर मी इतके कशाचे पैसे लागतात असे विचारले असता त्यांनी 'मी चेक करून पुढे पाठवतो त्यावरच सर्टीफिकेट मिळते. तुम्ही कागदपत्राची पुर्तता करून सांगितले प्रमाणे पैसे घेउन उद्या या नाहीतर तुमचे काम होणार नाही' असे मला सांगितले. तेव्हा मी तेथून परत घरी गेलो. माझे मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र करीता अर्जासोबतचे कागदपत्रे चेक करून पुढे पाठवुन जात प्रमाणपत्र लवकर तयार करून देण्याकरीता जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातील श्री. आंबोरकर हे मागत असलेले 5000/-रू. ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री पटल्याने व ती देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कार्यवाही करीता मी लेखी तक्रार देत आहे.
श्री. आंबोरकर बाबू यांचेशी माझे कोणतेही भांडण तंटे नसुन कोणतेही आर्थीक देवाण घेवाण व्यवहार नाहीत. त्यांनी कमी असलेले कागदपत्रे व 5000/- रूपये लाच रक्कम घेउन आज त्यांचे कार्यालयात बोलावल्याने त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. सहपत्रः- ऑनलाईन जात पडताळणी करीता सादर केलेला अर्ज व कागदपत्रे प्रत.
तक्रारदार सुकीराम भांडेकर यांनी वरील प्रमाणे मजकुराची दिलेली लेखी तक्रार व सोबत जोडलेल्या ऑनलाईन जात पडताळणी प्रमाणपत्राकरीता सादर केलेला अर्ज व कागदपत्रांवर तक्रारदार सुकीराम भांडेकर यांनी, पंचानी व मी सह्या करून तक्रार ताब्यात घेतली. तक्रारदार यांनी जात पडताळणी कार्यालय गडचिरोली येथील आंबोरकर बाबु यांचे विरूध्द दिलेली लेखी तक्रार खरी आहे किंवा नाही यांची खात्री करण्यासाठी दि.02/04/2026 रोजी लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.
त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सविस्तर सुचना दिल्यावर माझे सुचनेवरून पोअं घोरमोडे यांनी पंचांना व तक्रारदारास व्हाईस रेकॉर्डरची कार्यपद्धती समजावुन सांगुन त्यामध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री दिली. त्यांनतर 13.29 वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून त्यात आमचे, दोन्ही पंच व तक्रारदार सुकीराम भांडेकर यांचे वक्तव्य घेवुन व्हाॅईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टाचे आतील बंडी बनियानच्या खिशात सुरक्षित लटकवुन पंच क्र. 1 सुरेश राठोड सह श्री आंबोरकर बाबु यांची भेट घेण्यासाठी जात पडताळणी

बाजुचा खिसा अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या साहायाने तपासणी केली असता तक्रारदार यांचे उजव्या हातावर व शर्टाचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर उर्वरीत पंचनामा कार्यवाही करणेकरीता आंम्ही, सापळा पथक, दोन्ही पंच, इलोसे मंगेश मनोहर आंबोरकर, प्रकल्प सहायक, जिल्हा जात पडताळणी समिती , गडचिरोली (कंत्राटी) व इलोसे दिनेश कवडू सिडाम, कार्यालयीन सहायक जिल्हा जात पडताळणी समिती , गडचिरोली (कंत्राटी) असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे आलो. त्याबाबत तसा सविस्तर व विस्तृत सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी तक्रारदार नामे श्री. सुकीराम श्रीहरी भांडेकर यांनी दि. 02/04/2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई पंचनामा दरम्यान यातील तक्रारदार यांचेकडे त्यांच्या मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्राकरीता अर्जासोबतचे कागदपत्रे चेक करून अपलोड करून जात प्रमाणपत्र लवकर मीळवुन देण्याकरिता पंच क्र. 1 यांचे समक्ष इलोसे श्री. दिनेश कवडू सिडाम, कार्यालयीन सहायक जिल्हा जात पडताळणी समिती , गडचिरोली (कंत्राटी) यांनी तक्रारदारास आंबोरकर यांचे करिता 'आता कोणाकडुन दोन हजाराच्या खाली नाही घेत , आता दोन हजार मार तेती तु,' 2000 रू. लाच रक्कम देण्यास प्रेरीत करून प्रोत्साहन दिले तसेच तक्रारादाराने कागद असल्यावरही पैसे लागतात का असे विचारता 'हो ....अपलोड कराले' असे म्हणुन तसेच आंबारेकर यांचेकडे गेले असता 'कमी मधे करून टाका' असे श्री. आंबोरकर यांना सांगीतले . श्री मंगेश मनोहर आंबोरकर, पद- प्रकल्प सहायक, जिल्हा जात पडताळणी समिती , गडचिरोली (कंत्राटी) यांनी तक्रारदारास 'किती देता तुंम्ही सांगा, किती देता काम जर नाही झाला तर पैसेही नको द्या,तुले जेवढा कराचा आहे तेवढा कर, हजार करून टाका , इमानदारीने आणाचा , आंम्ही बारा वाजातले तरी येतीच आहोन' वैगेरे मजकुराचे स्वतः करीता लाच मागणीचे बोलणे करून तडजोडी अंती 1000/- रूपये लाच रक्कम स्वतःकरीता मागणी करून स्विकारण्याची संमती देवुन श्री मंगेश मनोहर आंबोरकर, पद- प्रकल्प सहायक, जिल्हा जात पडताळणी समिती , गडचिरोली (कंत्राटी) यांनी 1000/- लाचेची रक्कम स्विकारली असतांना रंगेहात मिळुन आल्याने श्री मंगेश मनोहर आंबोरकर, वय 42 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- प्रकल्प साहायक (कंत्राटी) जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गडचिरोली पत्ता- रा. कॅम्प एरीया रामपुरी वार्ड क्र. 18 गडचिरोली ता. जिल्हा गडचिरोली यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे व इलोसे श्री दिनेश कवडू सिडाम वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- कार्यालयीन सहायक (कंत्राटी) जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गडचिरोली पत्ता- रा. महीला महाविद्यालयाचे मागे, वृध्दाश्रम जवळ गडचिरोली ता. जि. गडचिरोली भ्र. प्र. अधिनियम 1988 (सुधारणा 2018) चे कलम 12 प्रमाणे गुन्हा केल्याची कायदेशीर फिर्याद आहे.

( संतोष पाटील )
पोलीस निरीक्षक,
ला. प्र. विभाग, गडचिरोली

सुरक्षित लटकवून तक्रारदार सुकीराम भांडेकर यांना पंच क्र. 1 सुरेश राठोड यांचे सोबत दुचाकी वाहनाने रवाना करून श्री आंबोरकर बाबू व सिडाम बाबू यांना भेटण्यासाठी जात पडताळणी कार्यालय गडचिरोली येथे पाठविण्यात आले. त्यांच्या पाठीमागे मी व पंच क्र. 2 श्री नितीन मेश्राम असे शासकीय दुचाकीने तसेच इतर सापळा पथक शासकीय चारचाकी वाहनाने व दुचाकीने जिल्हा जात पडताळणी कार्यालय गडचिरोलीचे परीसरात आडोसा घेवुन एकमेकांना दिसतील अशा रितीने सापळा लावुन थांबलो.

त्यानंतर तक्रारदार यांनी पंच क्र. 1 सह गडचिरोली जिल्हा जात पडताळणी कार्यालयाचे बाहेर येवुन लाच रक्कम स्विकारल्याचा 16.55 वा. नियोजित इशारा केला. त्याचवेळी आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य व पंच क्र. 2 यांचेसह घटनास्थळी पोहचलो . पोअं घोरमोडे यांचे करवी तक्रारदार कडील व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये पंच क्र. 1 यांचे वक्तव्य घेवुन बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर पंच क्र. 1 सुरेश राठोड यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता, त्यांनी सदर कार्यालयाचे आत मधे नेवुन तेथे हजर असलेल्या खाकी क्रीम कलरची शर्ट घातलेल्या इसमाकडे बोट दाखवुन हेच श्री आंबोरकर असुन यांनी तक्रारदार सुकीराम भांडेकर यांना मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्राकरीता अर्जासोबतचे कागदपत्रे चेक करून अपलोड करून जात प्रमाणपत्र लवकर मीळवुन देण्याकरिता लाचेची रक्कम स्विकारले आहे व बाजुला असलेल्या निळ्या रंगाचे शर्ट घातलेल्या श्री. सिडाम यांचेकडे अंगुली निर्देश करून यांनी तक्रारदारास आंबोरकर यांना लाच रक्कम देण्यास सांगुन प्रोत्साहन दिले आहे असे सांगीतले. यानंतर श्री आंबोरकर व श्री सिडाम यांना आमचे ओळखपत्र दाखवुन आमची ओळख देवुन दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आंबोरकर बाबु यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री मंगेश मनोहर आंबोरकर, वय 42 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- प्रकल्प साहायक (कंत्राटी) जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गडचिरोली पत्ता- रा. कॅम्प एरीया रामपुरी वार्ड क्र. 18 गडचिरोली ता. जिल्हा गडचिरोली असे सांगीतले. सिडाम बाबु यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री दिनेश कवडू सिडाम वय 38 वर्ष व्यवसाय नोकरी, पद- कार्यालयीन सहायक (कंत्राटी) जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गडचिरोली पत्ता- रा. महीला महाविद्यालयाचे मागे, वृध्दाश्रम जवळ गडचिरोली ता. जि. गडचिरोली असे सांगीतले. त्यानंतर सापळा पथकातील अंमलदारांमार्फत श्री. आंबोरकर व श्री. सिडाम यांचे हात पकडुन पंच क्र. 2 नितीन मेश्राम यांनी आंबोरकर बाबू यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खीशातुन लाच रक्कम 1000/-रू काढून घेवुन सदर नोटांचे क्रमांक OLN 721602, OVT 162016 असे असल्याने तक्रारदाराने लाच रक्कम म्हणुन दिलेल्या नोटांचा क्रमांक एकच असल्याची खात्री केली. तसेच आमचे सुचनेवरून पोशि घोरमोडे यांनी कार्यालयातील प्रकाश कमी करून अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या सहायाने श्री. आंबोरकर बाबु यांचे दोन्ही हात, लाचेची रक्कम व शर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशाच्या तोंडावर व आतील बाजुस तपासणी केली असता श्री. आंबोरकर यांचे परीधान केलेले शर्टाचे वरील डावे बाजुचे खिशाचे तोंडावर, व आतील बाजुस तसेच उजवे हाताचे बोटे व लाच रक्कम यावर ठिक ठिकाणी फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 1000/- रू. लाचेची रक्कम पंचासमक्ष लाखेने सिल मोहर करून जागीच जप्त करण्यात आले. त्यांनतर पुन्हा माझे सुचनेवरून पोशि घोरमोडे यांनी तक्रारदार सुकीराम भांडेकर यांचे हात व शर्टाचे समोरील डाव्या

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सेंमी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1984 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1988 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा): पोलीस निरीक्षक
Santosh Budha Patil

No. (क्र.): dgpsbpm8008 to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरौबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

स्टे. डा. अमलदार

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): VINOD DILIP CHAVAN

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): PI

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):